# प्राथमिक शिक्षण विभाग,
# जिल्हा परिषद, सांगली

## ई निविदा-१
## सन २०२०-२०२१

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नांव | :- | प्राथमिक शिक्षण विभाग,<br>जिल्हा परिषद, सांगली |
| कामाचे नांव | :- | प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टर मधील दस्तऐवजे स्कॅनिंग करुन प्रत्येक शाळेचे वैयक्तिक लॉगीन मध्ये पीडीएफ फाईलमध्ये वर्षवाईज उपलब्ध करुन देणे तसेच सर्व डाटा ऑनलाईनवर सर्व्हरवरती जतन करुन ठेवणसाठी अपलोड करुन देणे. |
| निविदा नोटीस क्र. | :- | **ई निविदा ०१ / २०२०-२०२१** |

Scanned by CamScanner

**प्राथमिक शिक्षण विभाग,जिल्हा परिषद सांगली**
**संक्षिप्त टिपणी - ई-निविदा क्र. १ सन २०२०-२०२१**

**कामाचे नांव :-** प्राथमिक शिक्षण विभाग,जिल्हा परिषद सांगली यांचेकडून अभिलेखे जतन व संगणकीकरण करणे अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टरमधील सर्व दस्तऐवजे स्कॅनिंग करुन स्कॅनिंग केलेली दस्तऐवज शाळेचे वैयक्तिक लॉगीनमध्ये पीडीएफ फाईलमध्ये अपलोड करुन देणे.व दस्तऐवज डाटा ऑनलाईन सर्व्हरवरती जनत करुन ठेवणेसाठी अपलोड करुन देणे.

प्राथमिक शिक्षण विभाग,जिल्हा परिषद सांगली यांचेकडून अभिलेख जतन व संगणकीकरण करणेचे योजनेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टर मधील दस्तऐवजे स्कॅनिंग करणेसाठी दोन लिफाफा ई-निविदा पध्दतीने पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहे. निविदाबाबतच्या नियम व अटी निविदा प्रसिध्दी दिनांक १७/०२/२०२१ ते दि. २४/०२/२०२१ पर्यत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेले आहे.

Sig X X X

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सांगली**

Sig X X X

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली**

Scanned by CamScanner

**प्राथमिक शिक्षण विभाग,**
**जिल्हा परिषद, सांगली.**
**जाहीर संक्षिप्त ई-निविदा नोटीस क्र. ०१ /२०२०-२०२१**

प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचेमार्फत खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे जिल्हा परिषदेकडील प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टरमधील दस्तऐवजे स्कॅनिंग करुन देणेसाठी पुरवठादार यांच्याकडून ई निविदेव्दारे निविदा मागविण्यात येत आहे

**कामाचे नांवः-** प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत जिल्हयातील प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टर मधील सर्व दस्तऐवजाचे विशिष्ठ पध्दतीच्या स्कॅनर दवारे स्कॅनिंग करुन,संगणक प्रणाली विकसित करुन प्रत्येक शाळेचे वैयक्तिक लॉगीन मध्ये PDF प्रकारामध्ये उपलब्ध करुन देणे तसेच सर्व दस्तऐवज डाटा ऑनलाईन सर्व्हरवरती जनत करुन ठेवणेसाठी अपलोड करुन देणे.

| Tender No | Specification | Grant Head | Estimate Cost Rs. | EMD In Rupees | E Tender Form Fee (Rupees) |
|---|---|---|---|---|---|
| 01/ 2020-2021 | जिल्हा परिषद सांगली कडील प्राथमिक शाळांतील जनरल रजिष्टर मधील सर्व दस्तऐवजाचे विशिष्ठ पध्दतीच्या स्कॅनर दवारे स्कॅनिंग करुन.संगणक प्रणाली विकसित करुन प्रत्येक शाळेचे वैयक्तिक लॉगीन मध्ये PDF प्रकारामध्ये उपलब्ध करुन देणे तसेच सर्व दस्तऐवज डाटा ऑनलाईन सर्व्हर वरती जनत करुन ठेवणेसाठी अपलोड करुन देणे. | जिल्हा परिषद स्वियनिधी २०२०-२०२१ | Rs. 9,00,000/- | Rs, 10000/- | Rs. 2000/- |

- ***ई-निविदा वेळापत्रक***

१) वरील ई-निविदेबाबत संपूर्ण माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून दिनांकः २४ / ०२ /२०२१ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत पाहता येईल व डाऊनलोड करता येईल.

२) दस्तऐवज स्कॅनिंग करुन देणेकरीता ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक : १७/०२ /२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून दिनांक : २४/०२ /२०२१ रोजी सायं १७.०० वाजेपर्यंत भरता येईल.

३) सदर ई- निविदा : २६ /०२ /२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता उघडण्यात येईल .

- ***ई-निविदा बाबत सर्वसाधारण सुचना***

१) जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांतील जनरल रजिष्टरमधील दस्तऐजव स्कॅनिंग करुन देणेची प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करणेत येत आहे. या निविदे संबंधी सर्व सुचना/शुध्दीपत्रके इत्यादी ऑनलाईन उपलब्ध करणेत येतील.

२) ई-निविदा फी व बयाणा रक्कम फी ऑनलाईन पेमेंट MAH e-procurement Payment व्दारे भरण्यात यावी.

३) नोंदणीकृत व अधिकृत पुरवठादार यांनी http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ई-निविदा फॉर्म उपलब्ध करुन घेणेच्या आहेत.

४) नोंदणीकृत पुरवठादार यांनी ई-निविदा भरतांना कागदपत्रांच्या मूळ प्रती अथवा छायांकित प्रती राजपत्रित दर्जाच्या अधिकाऱ्यांने सांक्षाकित किंवा स्वसाक्षांकित करुन pdf format मध्ये अपलोड करावयाच्या आहेत.

Scanned by CamScanner

५) शाळांचे रजिष्टर स्कॅनिंग करुन देणेसाठी पुरवठादारासाठी आवश्यक अटी व शर्ती तसेच ई-निविदा दाखल करणेचे वेळापत्रक इत्यादी माहिती उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

- ***ई-निविदा बाबत विशेष सूचना***

१) कव्हर नं.१ मध्ये सादर केलेली ई-निविदा फी व बयाणा फी (EMD) MAH e-procurement Payment व्दारे भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित MAH e-procurement Payment चा युनिक ट्रान्झॅक्शन रजिस्ट्रेशन क्रमाक नोंदवून तांत्रिक लिफाफ्यासोबत अपलोड करण्यात यावी.

२) ई-निविदामध्ये दर हे जीएसटी व इतर सर्व करांसहीत व शाळेच्या केंद्रस्तरावर जाऊन तेथे त्या केंद्रातील सर्व शाळांचे दस्तऐवज मागवून ते सर्व दस्तऐवजे स्कॅनिंग करुन देणेचे आहे त्यामुळे त्यासाठी अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही. त्यासाठी शाळास्तरापर्यतचे कामकाज असलेमुळे भरणेत यावे.

३) ई-निविदा प्रक्रिये दरम्यान शासनाचे दरकरार प्राप्त झालेस कुठल्याही स्तरावर ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येईल. तसेच निविदेतील अटी शिथील करण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना राहतील.

४) ई-निविदा मध्ये वरील कव्हर न.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी अंती परिपूर्ण असल्याची खात्री झालेशिवाय ई-निविदा कव्हर नं.२ उघडणेत येणार नाही. पात्र असणाऱ्या पुरवठादारांना कव्हर न.२ उघडणेची तारीख ऑनलाईन कळविणेत येईल. याबाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना राहतील.

- ***कव्हर नं.१ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे.***

१) निविदा अर्ज फी व बयाणा फी भरलेबाबतचे चलन (बयाणा फी माफ असल्यास MSME/NSIC/SSI चे अनुषंगिक दस्ताऐवज.

२) निविदाधारकांनी मागील वित्तीय वर्षे सन २०१८-२०१९ (Assessment Year २०१९-२०२०) चे आयकर विवरणपत्र भरणा केल्याची प्रत अपलोड करणे अनिवार्य आहे.

३) निविदा धारक हा वितरक असेल तर दुकाने व आस्थापना अधिनियमानुसार नोंदणी प्रमाणपत्र .

४) निविदाधारकाने जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र. तसेच पॅनकार्ड ची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) कामाबाबत गुणवत्ता व्यवस्थापन,पुरवठा व सेवा असलेबाबत माहिती निविदाधारकाने लेटरहेडवर तारीख नमूद करुन स्वतःच्या स्वाक्षरीसह अपलोड करावे.

६) निविदाधारक यांनी शासकीय/निमशासकीय/अशासकीय विभागास यापूर्वी निविदा रक्कमेएवढा संगणकविषयक कोणतेही काम केलेचा अनुभव दाखला जोडणे आवश्यक आहे.

७) निविदाधारक ज्या कामाची निविदा भरत आहे त्या कामासाठी लागणारे साहित्य (उदा.स्कॅनिंग मशीन ) हजर स्टॉक उपलब्ध असलेबाबत तसेच आदेश मिळालेनंतर त्यामधील नमूद कालावधीनुसार काम पूर्ण करणेत येईल याबाबतचे घोषणापत्र लेटरहेडवर तारीख नमूद करुन स्वतःच्या स्वाक्षरीसह अपलोड करावे.

८) निविदा धारका हा काळया यादीत नसलेबाबतचे किंवा ई निविदेत बंदी घातले नसलेबाबतचे घोषणापत्र लेटरहेडवर तारीख नमूद करुन स्वतःचे स्वाक्षरीसह अपलोड करावे.

९) निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबत निविदाधारकाने (निविदे सोबतचे बंधपत्र ) अधिकृत स्वाक्षरी शिक्यासह करुन अपलोड करावे.

**<u>कव्हर नं.२ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे.</u>**

१) वरील ई-निविदेच्या अनुषंगाने पुरविण्यात आलेली BOQ Excel(.xls) मधील File मध्येच दर भरणे निविदाधारकांना अनिवार्य आहे.सदर BOQ मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये. निविदाधारकाने दर भरत असतांना दरामध्ये सर्व करांचा (जी.एस.टी. वाहतुक,तसेच शासकीय सर्व करासहीत) समावेश करुन दर भरुन सदरची File कव्हर नं.२ मध्ये ऑनलाईन रित्या अपलोड करणे निविदाधारकांना बंधनकारक आहे. तसेच अपूर्ण किंवा असंबध्द दर सादर केल्यास संबंधिताची निविदा रद्द करणेत येईल. याबाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांना राहतील.

२) निविदाधारकाने वस्तुंचा,संख्येचा व विर्निदेशाचा विचार करुन दर सादर करावेत.

Scanned by CamScanner

***ई निविदेच्या इतर अटी व शर्ती***

१) उपलब्ध झालेले सर्व दस्तऐवजाचे विशिष्ठ पध्दतीच्या स्कॅनर दवारे स्कॅनिंग करुन,संगणक प्रणाली विकसित करुन प्रत्येक शाळेचे वैयक्तिक लॉगीन मध्ये PDF प्रकारामध्ये उपलब्ध करुन देणे तसेच सर्व दस्तऐवज डाटा ऑनलाईन सर्व्हरवरती जतन करुन ठेवणे व एक वर्षाचे सर्व्हरचे भाडेसहीत दर अपलोड करणेचे आहे.

२) निविदाधारकाने पुरवठा आदेश दिल्यापासून ३० दिवसांचे आत निविदेतील विनिर्देशाप्रमाणे शाळेचे रजिष्टर मधील दस्तऐवजे स्कॅनिंग करुन पुरवठा आदेशात नमूद केलेल्या ठिकाणापर्यंत व दिनांकापर्यंत शाळास्तरावर करुन देणे बंधनकारक राहील.

३) पुरवठादाराकडून पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५ % प्रती आठवडयाप्रमाणे दंड पुरवठादाराकडून आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) अभिलेखे स्कॅनिंग कालावधीमध्ये अभिलेखे स्कॅनिंग न केलेल्या करावयाचे कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % दंड

ब) अभिलेखे स्कॅनिंग कालावधीमध्ये अभिलेखे स्कॅनिंग न केलेल्या करावयाचे कामाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ०.५ % दंड

४) निविदेतील मंजूर केलेले दर हे ई-निविदा मंजूरीच्या आदेशाच्या तारखेपासून सहा महिने कालावधीसाठी पुरवठादारावर बंधनकारक राहतील.

५) पुरवठादारास मंजूर दराने व तपशिलाप्रमाणे स्कॅनिग करुन देणे बंधनकारक राहील.

६) पेढीने ई-निविदा सादर केलेली असल्यास,त्यातील भागीदाराने ती स्वाक्षरीत केली पाहिजे,किंवा कोणताही भागीदार अनुपस्थित असल्यास तसे करण्यास प्राधिकृत करणारा मुख्तीयारनामा (Power of Attorney) धारण करणा-या व्यक्तीने त्यांच्या वतीने ती स्वाक्षरीत केली पाहिजे.भागीदार / मुखतीयारपत्र (Power of Attorney) वगैरेची सत्यप्रत ई-निविदा सोबत जोडली पाहिजे.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली किंवा त्यांचा रितसर प्राधिकृत अधिकारी ई-निविदा उघडतील.ई-निविदा नाकारली गेल्यास अथवा ई-निविदा मंजूर न झालेस पुरवठादाराने अनामत ठेवलेली बयाना रक्कम ही MAH e-procurement Payment व्दारे संबंधित बँक खातेवर जमा होईल.

८) निविदेतील दस्तऐवजे स्कॅनिंगबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या विनिनिर्देशानुसार शासन दर करार अस्तित्वात आल्यास किंवा शासनाने खरेदी धोरणामध्ये काही बदल केल्यास किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रदद करणेचे ठरविल्यास असे अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

९) पुरवठादाराने मंजूर दराप्रमाणे काम न केल्यास सदर पुरवठादारास काळया यादीत घातले जाईल.

१०) जर ई-निविदा मंजूर झालेनंतर नमुद केलेनुसार काम न केल्यास किंवा अर्धवट काम केलेस निविदीमधील निम्नतम पात्र २ ( L-२ )कडून सदर काम करुन घेण्यात येईल व त्यासाठी येणारा खर्च,जर दर जास्त आल्यास जादा द्यावी लागणारी रक्कम ही मूळ पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल,व ही रक्कम ठरविण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सांगली यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

११) ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल अशा निविदाधारकास पुरवठा आदेश दिल्यापासून ८ दिवसांचे आत पुरवठा आदेशाच्या ३ टक्के इतकी रक्कम सुरक्षा ठेव जिल्हा परिषदेकडे जमा करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सांगली यांच्यासोबत रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक असेल.

१२) नामंजूर ई- निविदा धारकाला कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३)सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१४)निविदेमध्ये दर नमूद करताना एकच दर नमूद करावा.

***प्रदाने***

१)दस्तऐवजे स्कॅनिंग केलेल्या कामाचे प्रदान हे संबंधित तालुक्यातील केंद्रशाळास्तरावर केल्यावर शाळांचे स्कॅनिंगचे नमुद केलेल्याप्रमाणे चांगल्या प्रतीमध्ये प्राप्त झाल्याच्या गटशिक्षणाधिकारीच्या स्वाक्षरीच्या दिनांकित पोहोच पावत्या सह देयक सादर केल्यानंतर निविदाधारकाने आदा करावयाचा आहे.

२)दस्तऐवजे स्कॅनिग करावयाचे वेळी शासनाने पुरवठा धारकास देय असलेल्या रकमेमधून नियमानुसार आयकर,जी.एस.टी. व शासकीय कपातींची वसूली करण्याचे जे दर विहित केले असतील त्यानुसार आयकर,जी.एस.टी व शासकीय कपातीची वसूली केली जाईल.

३)स्कॅनिंगचे कामकाज पूर्ण झाल्याची पोहोच प्राप्त झालेनंतर स्कॅनिंग केलेल्या पानांची मंजूर दराप्रमाणे देयक दोन प्रतीत सादर केलेनंतर देयक आदा करणेची कार्यवाही केली जाईल.

Scanned by CamScanner

४)मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी  ई-निविदा मंजूर करणे संदर्भात घेतलेले सर्व निर्णय निविदाधारकास  बंधनकारक राहतील.

५)पुरवठा दाराने अनामत रक्कमेची मागणी करणेत आलेनंतर ती दोषदायित्व कालावधी(एक वर्ष) नंतर परत करणेत येईल.

६)महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांकः भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग-४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील अटी व शर्ती निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

**Sig X X X**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सांगली**

Scanned by CamScanner